गुड मॉर्निंग
लोकशाही वार्ता
# नागपूर
नागपूर, रविवार, २ फेब्रुवारी २०२५/९
epaper.lokshahivarta.in lokshahivarta lokshahivarta DailyLokshahiVarta



## अर्थसंकल्प प्रतिक्रिया

### शेतकरी, शेतमजूर, युवक यांची घोर निराशा करणारा अर्थसंकल्प –माजी मंत्री रमेशचंद्र बंग

**हिंगणा :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत मांडलेला देशाचा अर्थसंकल्प हा शेतकरी शेतमजूर व युवकांची घोर निराशा करणारा आहे. शेतकऱ्यांसाठी ठोस उपाययोजना नाही, तरुणांच्या हाताला रोजगार मिळेल यासाठी ठोस पावले उचलली नाही. उद्योग, शिक्षण, महिला यांच्यासाठी अर्थसंकल्पात काहीही नाही. देशाच्या एकूण करापैकी ३८% कर एकटा महाराष्ट्र भरतो. परंतु अर्थसंकल्पात महाराष्ट्राचा साधा उल्लेखही नाही. एकंदरीत हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसांची घोर निराशा करणारा आहे, असेच म्हणावे लागेल.



### देशाला विकसित आत्मनिर्भर बनविण्याचा अर्थसंकल्प - डॉ. राजीव पोतदार

**कळमेश्वर :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारीला सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये पुढील पाच वर्षे संतुलित विकास करणे हे ध्येय समोर ठेवून अर्थसंकल्प सादर केला असून, कृषी क्षेत्राला प्राथमिकता देण्यात आली आहे.



किसान क्रेडिट कार्डची पाच लाखांची मर्यादा कृषिधन धान्य योजनेची घोषणा या योजनेमुळे १.७ कोटी शेतकऱ्यांना लाभ होईल. देश कडधान्यासाठी आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने उचललेले हे एक मोठे पाऊल आहे. मध्यमवर्गांना दिलासा देत बारा लाख रुपयेपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केले आहे. कॅन्सर बिमारीला लागणारी दवाई स्वस्त व अन्य ३६ जीवन रक्षक दवाई स्वस्त होणार आहे. सादर केलेला अर्थसंकल्प हा सर्व समावेशक आहे, अशी प्रतिक्रिया भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव पोतदार यांनी दिली आहे.

### केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्रावर अन्याय - माजी जि.प. सदस्य दिनेश बंग

**हिंगणा :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प महाराष्ट्राची घोर निराशा करणारा आहे. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राच्या वाट्याला काही आलेले नाही. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातून भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना कमी जागा मिळाल्या, याचाच राग केंद्र सरकारला असल्याची शंका होत आहे. त्यामुळेच महाराष्ट्राच्या वाट्याला अर्थसंकल्पात काहीही मिळाले नाही. साधा महाराष्ट्राच्या नावाचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे बेरोजगारी, महागाई आटोक्यात आणण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना बजेटमध्ये दिसून येत नाही.



# अल्पवयीनांच्या हाती दुचाकी, पाच हजार दंड

**तालुका वार्ताहर/कळमेश्वर**

वयाच्या १८ वर्षे आधी वाहन चालविणे कायद्याने गुन्हा आहे. मात्र, तरीही कळमेश्वर शहरात अनेक अल्पवयीन मुले दुचाकी वाहन धूम स्टाईलने पळविताना दिसून येतात. मात्र, अल्पवयीन चालक वाहन चालविताना आढळून आल्यास पाच हजार रुपये दंड ठोठावण्याची तरतूद आहे. त्यामुळे पालकांनी अल्पवयीन पाल्याच्या हातात वाहन देऊ नये, असे आवाहन कळमेश्वर वाहतूक पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

लोकसंख्यापाठोपाठ प्रत्येक घरी दुचाकी चार चाकी वाहन असणे ही फॅशन झाली आहे. त्यामुळे प्रत्येक घराच्या अंगणात दुचाकी किंवा चार चाकी वाहन दिसून येते. घरीच वाहन असल्यामुळे अनेक मुले १८ वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच वाहन चालवितात. शाळा किंवा शिकवणी वर्गात जाण्यासाठी पालकही त्यांना दुचाकी उपलब्ध करून देतात. ही अल्पवयीन मुले कुठलीही तमान बाळगता झिकझाक धूम स्टाईलने गर्दीच्या ठिकाणावरून दुचाकी पळविताना दिसून येतात. शहरांमध्ये बुलेट दुचाकीच्या सायलेन्सरमध्ये बदल करून मॉडीफाय सायलेन्सर



बसवून फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेट चालकाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सायलेन्सरमधून अतिशय मोठा फटाका स्वरूपाचा आवाज येत असल्यामुळे अन्य वाहन चालकाचे लक्ष विचलित होत आहेत. त्यामुळे ध्वनिप्रदूषणाची भर पडत आहे.

शहरातून काटोलकडे जाणाऱ्या मार्गावर शहरातील सर्व शाळा, कॉलेज, खासगी दवाखाने, शासकीय दवाखाना, बँका व शासकीय कार्यालय आहेत. बुलेटचालक शाळा कॉलेज सुरू होण्याच्या वेळात व सुटी होण्याच्या वेळात व दिवसभर मोठा आवाज करीत. धावताना दिसून येतात. वाहनाचा मोठ्या प्रमाणात आवाज येत असल्यामुळे हृदयविकार असणाऱ्या रुग्णावर या आवाजाचा परिणाम होतो. तसेच अनेक जण स्टंटबाजी करतानाही दिसून येतात तरुणाईची वाहन चालवण्याची पद्धत बघितल्यावर रस्त्याने चालणाऱ्या नागरिकांच्या अंगावर शहारे येतात. वाहतूक पोलिस विभागातर्फे अल्पवयीन मुलांच्या हातात वाहन देऊ नये, असे आवाहन नेहमीच करण्यात येते. तरीसुद्धा पालक याकडे दुर्लक्ष करतात. काही दुचाकी चालकांनी फॅन्सी नंबर प्लेट बसवून त्या प्लेटवर आई, दादा, बाबा, काका व डॅड गिफ्ट ही नावे आढळून येतात. तर काही दुचाकी विना नंबर प्लेटच्याही आढळून येतात. अठरा वर्षापेक्षा कमी वय असेल तर वाहन चालविणे कायद्याने गुन्हा आहे. अल्पवयीन वाहन चालविताना आढळल्यास चालक व त्यांच्या पालकावरील कारवाई करून पाच हजार रुपये दंड करण्यात येतो. त्यामुळे पालकांनी अल्पवयीन मुलाच्या हातात वाहने देऊ नये व दुचाकी चालकांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेटचा नियमित वापर करावा, असे आवाहन कळमेश्वर पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक मनोज काळबांडे यांनी केले आहे.

## शेतकऱ्याचा शेतात मृत्यू

**तालुका वार्ताहर/कळमेश्वर**

तालुक्यातील सावळी खुर्द येथे येथील शेतकरी शेतात कापूस वेचण्याकरिता गेला असताना शेतातच मृत्यू झाल्याची घटना ३१ जानेवारीला सायंकाळी ६ वाजता उघडकीस आली. चंद्रधर नामदेव बागडे (वय ६०) रा. वॉर्ड क्र. ३ सावळी खुर्द मृतक शेतकऱ्याचे नाव असून सावळी खुर्द शिवारात त्यांची शेती आहे. शुक्रवारी आपल्या शेतामध्ये कापूस वेचण्याकरिता गेला होता. परंतु सायंकाळी घरी न परतल्यामुळे त्यांचे कुटुंबीय शोध घेण्याकरिता शेतात गेले असता सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान शेतातील एका झाडाखाली मृत अवस्थेत आढळून आला. पोलिस प्राप्त माहितीनुसार मृतक शेतकऱ्याला जुना क्षयरोगाचा आजार असल्याची माहिती मिळाली. कळमेश्वर पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून १ फेब्रुवारी रोजी कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. अधिक तपास कळमेश्वर पोलिस स्टेशनचे ठाणेदार मनोज काळबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार संजय वानखेडे व शिपाई दुर्गेश डहाके करीत आहेत.

## देशी दारूच्या ट्रकला आग

### लाखो रु.चे नुकसान

**वार्ताहर/वाडी**

वाडी येथील शिवाजीनगरातील निवासी वसाहतीमध्ये असलेल्या जेसवानी लिकर्स गोडाऊच्या समोर देशी दारूच्या पेट्या भरून उभ्या असलेल्या ट्रकला रात्री अचानक आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली.

१ फेब्रुवारी रोजी पहाटे चार ते सव्वा चार वा.च्या दरम्यान भावेश पटेल यांच्या मालकीच्या शिवो एंटरप्रायजेसचा देशी दारूच्या पेट्या भरून असलेला ट्रक (क्र. एम एच ४९ एटी ५६३५, ट्रक मालक जनरल सैनी यांच्या मालकीचा) रात्रीला जेसवानी लिकर्स गोडाऊनसमोर उभा होता. पहाटे चार ते सव्वा चारच्या दरम्यान अचानक ट्रकला आग लागल्याने परिसरात खळबळ पसरली.



जागरूक नागरिकांनी त्वरित गोडाऊन मालक, अग्निशमन विभागाला सूचना दिल्या. ट्रकमध्ये अंदाजे ६० लाख रु.चा देशी दारूचा माल होता. अग्निशमन विभागाने घटनेची त्वरित दखल घेतल्याने ट्रकसह अर्ध्याअधिक मालाचे नुकसान वाचविल्याची चर्चा होती. तरीदेखील लाखो रु.च्या मालाचे नुकसान झाले.

उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी केली असता अज्ञात इसमाने आग लावल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन पर्यवेक्षक भाग्यश्री टोंगसे यांच्या सूचनेवरून विमोचक वैभव कोळसकर, आनंद शेंडे, कपिल गायकवाड, शुभम डांगाले, अंकुश कोळसकर व विद्युत कर्मचारी खुशाल खोरगे यांनी घटनास्थळी धाव घेऊन लागलेली आग आटोक्यात आणली. सदर आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## रेल्वेच्या धडकेत युवकाचा मृत्यू

**वार्ताहर/खापरखेडा**

खापरखेडा पोलिस स्टेशन हद्दीत चनकापूर शिवारात रेल्वेच्या धडकेने तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवार, १ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. ब्रिजेश अत्तरलाल कहार (वय १८) रा. सदभावना कॉलनी, पाटणसावंगी असे मृतकाचे नाव आहे.

मृताची बहीण रेल्वे पटरीच्या बाजूला असणाऱ्या शिवरामनगर चनकापूर येथे मैत्रिणीकडे आली होती. बहिणीला घेण्यासाठी चनकापूर शिवरामनगर येथे आला. तो घरून दुपारी १ वाजता चनकापूर साठी निघाला. बहिणीला थोडा वेळ असल्याने रेल्वे पटरीच्या बाजूला त्याने आपली दुचाकी गाडी उभी ठेवून कानात मोबाईलचे ब्लुट्यूथ लावून गाणे ऐकत होता. यावेळी अचानक ट्रेनने त्याला धडक दिली. यात तो गंभीररित्या जखमी झाला. घटनेची माहिती खापरखेडा पोलिसांना रेल्वे पटरीच्या बाजूला एक तरुण मुलगा रेल्वेने कटुन पडलेला असल्याचे सांगण्यात आले. लागलीच पोलिस निरीक्षक अरविंद कतलाम यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक आरती नरोते, पोलिस कर्मचारी शेखर वानखेडे आपल्या सहकर्मी सह घटनास्थळी पोहचले. दरम्यान जखमीला जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारार्थ??? हलविण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत घोषित केले. लगेच घटनेचा पंचनामा करून मृतदेह नागपूर मेयो रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी हलविण्यात आले. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## ईसापूर येथील आमदंगलीतील कुस्ती ठरली आकर्षणाचे केंद्र

**वार्ताहर/कोदामेंढी**

बाबदेव-धामणगाव जिल्हा परिषद क्षेत्रात येणाऱ्या गट ग्रामपंचायत अंजनगाव अंतर्गत येणाऱ्या ईसापूर येथे दोन दिवसीय मंडईनिमित्त आमदंगलीचे आयोजन करण्यात आले होते. यात अनेक पहेलवानांच्या कुस्तीपैकी गट ग्रामपंचायत अंजनगावचे ईसापूर येथे राहणारे उपसरपंच पहेलवान प्रफुल्ल मेहर यांनी पिपरी येथील पहेलवान दीपक किरपान यांच्याविरुद्ध चुरशीच्या लढतीत व ५००१ रोख बक्षिसांचा वर्षाव होऊन विक्रमाची नोंद होणारी, जिंकलेली कुस्ती आकर्षणाचे केंद्र ठरली.

आमदंगलीच्या उद्घाटनाला माजी आ. टेकचंद सावरकर, अनुसूचित जाती मोर्चा भाजप जिल्हाध्यक्ष नरेश मोटघरे, माजी जि.प. सदस्य कैलास बरबटे, देवेंद्र गोडबोले, शेषराव देशमुख, अंजनगाव सरपंच चिंतामण सारवे, एलआयसी सल्लागार विनोद पाटील, भाजप कार्याध्यक्ष रमेश कुंभलकर, मनीराम यादव, पोलिस पाटील सुवर्णा डोंगरे, माजी पोलिस पाटील कल्याण जाने, माजी सैनिक अजय डोंगरे, ईश्वर वैरागडे, रामराव डोंगरे, एलआयसी सल्लागार खेमचंद मेहरसह गावातील, परिसरातील, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी पुढारी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदंगलीचे संचालन गणेश मेहर (गुरुजी), शुभम ठाकरे यांनी केले.

१ फेब्रुवारी रोजी शाहीर जयकुमार राहानगडाले आणि शाहीर उरमिला कवडू साथी मनोज खडसे यांच्या दुय्यम राष्ट्रीय खडा तमाशा आयोजित करण्यात आला होता.

# संमेलनाने नाट्यचळवळीला उर्जितावस्था येईल - डॉ. गांधी

**लोकशाही वार्ता / नागपूर**



१०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे विभागीय स्तरावर आयोजन करण्याचा मान नागपूरला मिळाला असून हे संमेलन दर्जेदार व्हावे, यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करायला पाहिजे. या संमेलनाने नागपूर, विदर्भातील नाट्यचळवळीला उर्जितावस्था येईल, असे मत १०० व्या नागपूर विभागीय नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि नाट्यपरिषदेचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी यांनी व्यक्त केले.

नागपूर विभागातील नाट्यसंमेलन येत्या मार्च महिन्यात होणार असून त्याच्या तयारीची सुरुवात शनिवारी विष्णूजी की रसोई येथे श्री नटराज पूजनाने व घंटा वाजवून संमेलनाच्या तयारीची सुरुवात करण्यात आली. यावेळी नाट्य परिषदेच्या नागपूर शाखेचे कार्यवाह व मध्यवर्तीचे उपाध्यक्ष नरेश गडेकर, अध्यक्ष अजय पाटील, उपाध्यक्ष सचिन गिरी, प्रसिद्ध चित्रपट अभिनेते देवेंद्र दोडके, ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर आंबोणे, बापू चनाखेकर, डॉ. निलकांत कुलसंगे, किशोर आयलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. हे विभागीय संमेलन सर्वसमावेशक व्हावे यासाठी सर्व रंगकर्मींनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन डॉ. गिरीश गांधी यांनी केले. संचालन अतुल शेबे यांनी केले तर नरेश गडेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला नाट्य परिषदेचे नितीन पात्रीकर, किशोर डाऊ, प्रशांत मंगदे, प्रदीप धरमठोक, संजय जीवने, वत्सला पोलकमवार, आसावरी तिडके, कुणाल गडेकर, संजय भाकरे, देवेंद्र लुटे, संजीवनी चौधरी, डॉ. दीपाली घोंगे, रमेश भिसीकर, संजय वलीवकर, मीना देशपांडे, विवेक खेर, महेश पातूरकर, स्वप्निल बन्सोड, सारिका पेंडसे यांच्यासह अनेक रंगकर्मी उपस्थित होते.

# खासदार क्रीडा महोत्सवाचा आज समारोप

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती

**लोकशाही वार्ता/नागपूर**

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला खासदार क्रीडा महोत्सव नागपूर शहरासह संपूर्ण विदर्भातील खेळाडूंसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे. मागील २० दिवसांपासून सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवाचा रविवार, २ फेब्रुवारी २०२५ रोजी समारोप होत आहे.

यशवंत स्टेडियम येथे सायंकाळी ५.३० वाजता सातव्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाला सुरुवात होईल. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर अध्यक्षस्थानी ना. नितीन गडकरी राहतील. प्रमुख अतिथी महसूलमंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पॅरालिम्पिक पदक विजेती ठरलेली शीतल देवी उपस्थित राहतील. समारोपीय कार्यक्रमाला सुप्रसिद्ध सनम बँडच्या लाईव्ह इन कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती खासदार क्रीडा महोत्सवाचे संयोजक माजी महापौर संदीप जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी, खासदार क्रीडा महोत्सवाचे सचिव डॉ. पीयूष आंबुलकर, सुधीर दिवे, महोत्सवाचे सहसंयोजक डॉ.पद्माकर चारमोडे, नागेश सहारे, अशफाक शेख उपस्थित होते.



**असा झाला महोत्सव**

१२ जानेवारी २०२५ खासदार क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. २० दिवस शहरातील ७३ क्रीडांगणांवर ५८ खेळांच्या स्पर्धा पार पडल्या. विविध ५८ खेळांच्या तब्बल २९०० चमू, ६००० ऑफिसियल्स, ८० हजार खेळाडूंचा महोत्सवात समावेश होता. एकूण १३१०० स्पर्धा खेळविण्यात आल्या यात खेळाडूंना १२३१७ मेडल्स आणि ७६२ ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. स्पर्धेतील विजेत्यांना १ कोटी ५० लक्ष रुपयांचे बक्षीस प्रदान करण्यात आले.

त्यांनी सांगितले की, यंदा सुनील रायसोनी यांना उत्कृष्ट क्रीडा संघटक पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. उत्कृष्ट क्रीडा संघटन पुरस्कार दोन संघटनांना विभागून मराठा लॉन्सर्स आणि भारत व्यायाम शाळा यांना उत्कृष्ट क्रीडा संघटन पुरस्काराने गौरविण्यात येईल. तिरंदाजी स्पर्धेचे प्रशिक्षक मोहम्मद झिशान, बॅडमिंटन प्रशिक्षक किरण माकोडे आणि दिव्यांग क्रीडा स्पर्धांमधून अनेक खेळाडूंना नवी दिशा देणारे विनय उपासनी गौरविण्यात येईल. प्रत्येकी ५१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह प्रदान करुन उत्कृष्ट क्रीडा संघटक, उत्कृष्ट क्रीडा संघटन आणि उत्कृष्ट क्रीडा प्रशिक्षकांना सन्मानित येईल. यंदा विविध खेळांच्या २९ खेळाडूंची क्रीडा भूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून, प्रत्येकी ३१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात येईल.

**क्रीडा भूषण पुरस्कार विजेते**

सुनील पांडे (आट्या-पाट्या), हर्षल चुटे योगा, सिया देवधर (बास्केटबॉल), प्रांजल खोब्रागडे (कुस्ती), रोहण गुरबानी (बॅडमिंटन), मनीषा मडावी (खो-खो), नेहा ढबाले (अॅथलेटिक्स), मिताली भोयर (मॅरेथॉन), मृणाली पांडे (दिव्यांग (ब्लाइंड बुद्धिबळ)), प्रतीक मोपकर (टेबल टेनिस (एम.आर), निधी तरारे (मूकबधिर (अॅथलेटिक्स), हेरंभ पोहाणे (लॉन टेनिस), साईप्रसाद काळे (ज्युदो), हिमानी गावंडे (हॉकी), अनन्या नायडू (रायफल शुटिंग), क्षितिजा सावरकर (कबड्डी), रहनुमा आलमशेख (सॉफ्टबॉल), दिग्विजय आदमने (स्वीमिंग), नील हिंगे (धनुर्विद्या), समक्षा सिंग (बॉक्सिंग), विवान सारोगी (बुद्धिबळ), ईशान काळबांडे (जिमनॅस्टिक), कस्तुरी ताम्हनकर (स्केटिंग), यश शुक्ला (फुटबॉल), ओम मारशेट्टीवार (तायक्वाँदो), शहनवाज खान (सेपक टॅकरा), स्नेहल जोशी (ट्रायथोलॉन), रूतीका अरायकर (कराटे), निखिल लोखंडे (कॅरम).

## निधन वार्ता

### प्रभाकरराव देशपांडे



**नागपूर :** मूल, परतवाडा, जि. अमरावती निवासी, ब्राम्हण सभेचे कार्यकर्ते, अच्यूत महाराजांचे शिष्य प्रभाकरराव त्रि. देशपांडे यांचे रविनगर शासकीय वसाहत या निवासस्थानी शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ सकाळी ८ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार रविवारी सकाळी ८ वाजता अंबाझरी घाटावर होणार आहेत. त्यांच्यापश्चात पत्नी, ३ मुली, एक मुलगा, ३ जावई, स्नुषा आणि नातवंडे आहेत. यासह बराच मोठा आप्तपरिवार आहे.

### मालतीबाई आग्रेकर



**नागपूर :** श्री जैन सेवा मंडळाचे माजीमंत्री सुरेश आग्रेकर यांच्या मातोश्री मालतीबाई मगनलाल आग्रेकर यांचे वृद्धाकाळाने वयाच्या ९६ व्या वर्षी शनिवारी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा रविवार, २ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता त्यांचे निवासस्थान खोडे यांच्या घराजवळ, गांधी नर्सिंग होमच्या मागे, पी.एन.जी. ज्वेलर्सजवळ, दारोडकर चौक, नागपूर येथून निघून गंगाबाई घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्यामागे दोन मुले, सुरेश व सुधीर आग्रेकर, दोन मुली व मोठा आप्तपरिवार आहे.

# आदिवासींचे आरोग्य व जीवनमान उंचावण्यास नवी दिशा मिळेल

### गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचा विश्वास

**लोकशाही वार्ता / नागपूर**

दुर्गम आणि वंचित आदिवासी भागातील लोकांच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर चर्चा व त्यावर प्रभावी उपाययोजनेसाठी तज्ञांचे विचारमंथन नेहमीच दिशादर्शक ठरते. या दृष्टीने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने व्यापक विचारमंथनासाठी जागतिक स्तरावरील फिस्ट २०२५ या आंतराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. आदिवासी समाजातील आरोग्य व जीवनमान उंचावण्यास या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून नवी दिशा मिळेल, असा विश्वास गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी येथे व्यक्त केला.

आदिवासींच्या आरोग्यविषयक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी मुख्यमंत्री प्रमोद सावंत



बोलत होते. आदिवासी विकासमंत्री प्रा. अशोक उईके, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त), एम्सचे संचालक डॉ. प्रशांत जोशी, परिषदेचे संयोजक डॉ. संजीव चौधरी, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. दुर्गम भागातील आदिवासींना कुपोषण, संसर्गजन्य रोग आणि सिकलसेल यासारख्या आजारांना सामोरे जावे लागते. या आंतरराष्ट्रीय परिषदेत विविध विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. त्याचा निश्चितच फायदा येत्या काळात होणारा असल्याचे ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात गेल्या दहा वर्षात आदिवासी समाजातील व्यक्तींसाठी विविध योजना व उपक्रमाच्या माध्यमातून सशक्तिकरणाचे प्रयत्न सुरू आहेत. येत्या काळातही या योजना व उपक्रमाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रा. अशोक उईके यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदिवासी समाज बांधवांची सर्वंकष उन्नती व्हावी याकडे विशेष लक्ष आहे. त्या अनुषंगाने विविध योजना व उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत असल्याचे ते यावेळी म्हणाले. राज्यातील १३ जिल्हे हे पेसा कायद्याअंतर्गत येतात. यात ५९ तालुक्यांचा समावेश आहे. राज्यातील ४१ जिल्ह्यातील मतदारसंघात आदिवासीबहूल लोकसंख्या आहेत. पालघर ते भामरागड असा हा समाज विस्तारित आहे. या परिषदेच्या माध्यमातून पुढे आलेल्या विविध बाबींच्या अनुषंगाने पुढील महिन्यात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि एम्स यांच्यासोबत आदिवासी विकास विभागाची एक बैठक घेण्यात येणार असल्याचे व त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मंत्री प्रा. उईके यावेळी म्हणाले.


आवक क्रमांक ACC-1/877/2025
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर
मूख्यमंत्राचे सचिवालयासमोर, सिविल लाईन्स, नागपूर, मुंबई, मुंबई, मुंबई

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन. क्रमांक : NGP/13326/18/24
फेरफार अहवाल अर्ज क्रमांक...
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक **डॉ. बनसोड चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर बाबत।**
न्यासाचा पत्ता : द्वारा **अनिता बळीराम बनसोड,** प्लाट नं. 19, डंभारे ले आउट, त्रिमूर्तिनगर, राणाप्रताप नगर, रिंग रोड, नागपूर.
**अर्जदार : श्री. निशिकांत भिमराव कापसे,**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, नागपूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :-
1) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**
अ.क्र. : 1, तपशील : MEMBERSHIP FEES, अंदाजे मूल्य : 10,000.00
अ) जंगम मिळकत : रोख रु. 10000/- मात्र (अक्षरी रुपये दहा हजार मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही **नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत** या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जांचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक 27-01-2025 रोजी दिली
**अधिक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर

## दृष्टिक्षेप

### ५,३९९ वाहन चालकांवर कारवाई

**लोकशाही वार्ता/नागपूर**
महाराष्ट्र दारूबंदी तसेच एनडीपीएस कायद्यान्वये एकूण ९ प्रकरणांत ९ जणांकडून १ लाख ३१ हजार ६०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायद्यान्वये ५ प्रकरणांत ७ जणांकडून ४ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली ५ हजार ३९९ वाहन चालकांवर कारवाई केली. त्यांच्याकडून ४ लाख ६० हजार ६५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले. नागपूर शहर पोलिसांनी वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या राबविली. यापुढे देखील ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. परिणामी, वाहन चालकांनी वाहन चालविताना सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गुन्ह्याच्या बेतातील गुंडाला अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**
गुन्ह्याच्या तयारीत असलेल्या एका तडीपार गुंडाला गुन्हे शाखा पोलिसांनी अटक केली. राहुल धनराज हातीबेड (२७, रा. कामगार कॉलोनी, सुभाषनगर, प्रतापनगर) असे त्याचे नाव आहे. गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ चे अधिकारी व अंमलदार शुक्रवारी पेट्रोलिंग करीत होते. रात्री ९ वाजताच्या सुमारास मिळालेल्या माहितीवरून त्यांनी प्रतापनगर पोलिस ठाणे हद्दीतील सुभाषनगर बुद्ध विहाराजवळील परिसरात पाहणी केली असता आरोपी राहुल हातीबेड हा पोलिसांना बघून पळू लागला. त्याला पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. पोलिस ठाण्यात आणून त्याचा अभिलेख तपासला असता त्याला परिमंडळ क्रमांक १ च्या पोलिस उपायुक्तांनी २८ नोव्हेंबर २०२४ रोजी २ वर्षाकरिता शहर व ग्रामीण भागातून हद्दपार केले असल्याचे समजले. आरोपी हा विनापरवाना शहरात वावरत होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली आहे.

### कोराडीत १.६१ लाखांची घरफोडी

**लोकशाही वार्ता/नागपूर**
वडिलांच्या घरी मुक्कामाला गेलेल्या मुलाच्या घरात चोरट्याने हातसाफ केला. घराच्या दाराचे कुलूप तोडून चोरट्याने १ लाख ६१ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, प्लॉट नंबर ४०, शंभूनगर, कोराडी येथे जयनब शेख अमन शेख (३५) राहतात. ते शुक्रवारी घराला कुलूप लावून वडिलांकडे राहायला परिवारासह गेले होते. यादरम्यान, त्यांच्या घराला चोरट्यांनी लक्ष केले. चोरट्याने घराच्या दाराचा कडीकोंडा आणि कुलूप तोडले आणि आत प्रवेश केला. घरातील बेडरूममध्ये ठेवलेली ७० हजारांची रोकड, सोन्या-चांदीचे दागिने तसेच साउंड सिस्टम, डीव्हीआर व घड्याळ असा एकूण १ लाख ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी जयनब शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोराडी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# विकसित भारताच्या घोडदौडीत महाराष्ट्रही अग्रेसर

## अमृत काळात भारताला आर्थिक सुबत्ता देणारा अर्थसंकल्प - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**लोकशाही वार्ता/नागपूर**
गरीब, युवक, शेतकरी, महिला या चार घटकांना समर्पित आणि शेती विकास आणि उत्पादकता, ग्रामीण समृद्धी आणि शाश्वतता, रोजगार आधारित विकास, मनुष्यबळ तयार करणे, नावीन्यपूर्ण गुंतवणूक, ऊर्जेची उपलब्धता आदी १० क्षेत्रांना व्यापत अमृतकाळात भारताला सुबत्ता देणारा आणि पर्यायी इकोसिस्टीम तयार करणारा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. राज्यांसाठीही यात महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या असून, याचा लाभ घेत महाराष्ट्रही विकसित भारत देशाच्या घोडदौडीत अग्रेसर होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




मनी बी इन्स्टिट्यूटच्यावतीने येथील लक्ष्मीनगर परिसरातील सायंटिफीक सोसायटीच्या लॉनवर आयोजित 'अमृतकाळ विकसित भारत -२०४७' परिषदेचे उद्‌घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. संसदेत सादर झालेल्या वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना ते बोलत होते.

**सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचा भारताच्या एकूण उत्पादन क्षेत्रात ३६ टक्के वाटा आहे. यावर लक्ष केंद्रित करून अर्थसंकल्पात या क्षेत्रात उत्पादन वाढ व रोजगार निर्मितीसाठी १.५ लाख कोटींच्या योजना आणल्या आहेत. मध्यम वर्गाला केंद्रस्थानी ठेवून देशाच्या अर्थसंकल्पाच्या इतिहासात प्रथमच आयकर मर्यादा १२ लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे मध्यमवर्गीयांची क्रयशक्ती वाढेल व त्याने रोजगार निर्मिती, उत्पादनालाही चालना मिळेल.**

केडिया सिक्युरिटीजचे व्यवस्थापकीय संचालक विजय केडिया आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य व्यवसाय विकास व्यवस्थापक श्रीराम कृष्णन आणि मनी बी संस्थेच्या संचालक शिवानी दाणी-वखरे यावेळी उपस्थित होत्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने बियाणे, सिंचनाच्या सोयी, विजेची उपलब्धता आदी एकात्मिक कार्यक्रम देशातील १०० जिल्ह्यांमध्ये राबविण्याची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असून, याद्वारे १ कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

डाळी, तेलबियांचे उत्पादन वाढवून देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी सहा वर्षांचा विशेष कार्यक्रम आखण्यात आला आहे. देशातील कापसाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने येत्या पाच वर्षांसाठी कापूस मिशन हाती घेण्यात आले आहे. विदर्भ, मराठवाड्यासह राज्यातील कपाशी पिकाखालील ५० लाख हेक्टर क्षेत्रावर घेण्यात येणाऱ्या कपाशी पिकाच्या उत्पादन वाढीसाठी याचा लाभ होईल. किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाखांवरून ५ लाखांपर्यंत वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देणे आदी महत्त्वाच्या तरतुदी अर्थसंकल्पात असल्याचे त्यांनी सांगितले.

**मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्मितीसाठी अर्थसंकल्पात तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यांना ५० वर्षांसाठी १.५ लाख कोटी बिनव्याजी कर्ज देण्याची महत्त्वपूर्ण बाब या अर्थसंकल्पात आहे. पीपीपीच्या माध्यमातून पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये गुंतवणूक वाढविण्यास प्रोत्साहन देण्याची बाबही अर्थसंकल्पात मांडण्यात आली आहे. प्रथमदर्शनी महाराष्ट्रासाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद दिसून येते.**

# जिल्ह्यासाठी 'डीपीसी'तून १२०० कोटींच्या मागणीचा सूर

## बैठकीत पालकमंत्र्यांसह लोकप्रतिनिधींची एकमताने मंजुरी

**लोकशाही वार्ता / नागपूर**
जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समिती (डीपीसी)तून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी जिल्ह्याकरिता राज्य शासनाकडे१२०० कोटींची मागणी करू, असा सूर राज्याचे महसूल तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी डीपीसीच्या बैठकीत काढला. त्याला सर्व लोकप्रतिनिधींनी एकमताने मंजुरी दिली.

शनिवार, १ फेब्रुवारीला जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक पालकमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन विभागाच्या सभागृहात पार पडली. बैठकीला वित्त राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, प्रवीण दटके, समीर मेघे, परिणय फुके, अभिजित वंजारी, संजय मेश्राम, चरणसिंग ठाकूर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार विकास प्राधिकरणाचे आयुक्त संजय मीणा, मनपाचे अतिरिक्त आयुक्त आचंल गोयल, जिल्हा परिषदेचे सीईओ विनायक महामुनी, अपर पोलिस अधीक्षक रमेश धुमाळ, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश गायकवाड व सर्व विभाग प्रमुख उपस्थिती होते. नियोजन विभागाने १६११ कोटींचा प्रस्ताव असल्याचे सांगितले.

गतवर्षी ९४४ कोटी मंजूर झाल्याने यंदा १२०० कोटींची मागणी राज्यस्तरावरील बैठकीत करू, असे पालकमंत्री म्हणाले. त्यावर १३०० कोटींची मागणी करण्याच्या सूचना काही आमदारांनी केल्या. लाडकी बहिणीला निधी द्यायचा आहे. त्यामुळे जास्त निधीची मागता येणार नसल्याचे मिश्किलपणे बावनकुळे म्हणाले. तर अनुसूचित जाती उपयोजनांतर्गत २५० कोटींची तर आदिवासी उपयोजनेसाठी १५० कोटींची मागणी करू. वित्तमंत्री अजित पवार हे आमच्या मागण्याबद्दल सकारात्मक विचार करतील, असा विश्वास त्यांनी व्यक?त केला. जिल्हा परिषदेतील अखर्चित निधी खर्च करण्याची वित्तमंत्री यांनी अनुमती दिल्याने आता आणखी ४० कोटी रुपये जिल्ह्याला उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### सीसीटीव्हींची होणार चौकशी

**सुरक्षिततेच्यादृष्टीने शहरात विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेराचे जाळे निर्माण केले. सुमारे चार हजार कॅमेरे स्मार्ट सिटी अंतर्गत आपण लावले. सद्यस्थितीत यातील दोन हजार कॅमेरे सुरू असून, उर्वरित नादुरुस्त झालेल्या कॅमेऱ्यांना काढून नवीन कॅमेरे बसविण्यासाठी व ऑप्टिक फायबर केबलसाठी निधी उपलब्ध करू, असे पालकमंत्री यांनी सांगितले. सुरक्षिततेच्यादृष्टीने वाढत्या महानगराचा विचार करून काही ठिकाणी नवीन पोलिस चौक्या द्याव्या लागणार आहेत. कामठीसाठी पोलिस विभागाचा स्वतंत्र झोन ६ आवश्यक झाला आहे. याबाबत परिपूर्ण प्रस्ताव येत्या सात दिवसांत सादर करण्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर सदर कॅमेराबाबत वस्तुस्थिती दर्शक अहवाल एक आठवड्यात सादर करण्याचे पालकमंत्र्यांनी निर्देश दिले.**

### जनतेसाठी उद्याने खुली करू

नागपूर शहरात रोजगाराला चालना देणारी अनेक उद्याने बंद अवस्थेत आहेत. अंबाझरी व इतर उद्यानाबाबत जे काही वाद असतील अथवा जो काही भाग न्यायप्रविष्ठ असेल तेवढा वगळून नागरिकांना त्यांच्या हक्काच्या असलेल्या उद्यानाचा वापर करता आला पाहिजे. त्यांना यात पायी फिरण्यासाठी सुविध उपलब्ध होईल, असे सांगून पालकमंत्र्यांनी अंबाझरी तलाव उद्यानासह इतर उद्यान खुले करण्यास सांगितले.

**शासकीय योजनांसाठी लागणारा पैसा हा सामान्य जनतेसह सर्वांनी दिलेल्या कराच्या माध्यमातून गोळा होतो. समाजातील प्रत्येक घटकाला आपला विकास व्हावा, अशी त्यांची साधी अपेक्षा असते. या अपेक्षानुसार मंजूर कामांना पूर्ण करण्याची जबाबदारी ही डीपीसीमार्फत सर्व प्रशासकीय यंत्रणांवर आहे. प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या जबाबदारीला ओळखून पारदर्शीपणे कामांप्रती कटिबद्ध होत गुणवत्तेने कामे करावे, असे निर्देश यावेळी बावनकुळे यांनी दिले.**

## 'जेजेएम'च्या कामांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी

**लोकशाही वार्ता / नागपूर**
देशभरातील प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठा व्हावा, यासाठी केंद्राने 'जलजीवन मिशन' (जेजेएम) योजना आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरी नळाद्वारे पाणीपुरवठ्याचे ध्येय निश्चित केले आहे. परंतु जिल्ह्यात या कामांसंदर्भात विविध तक्रारी स्थानिकांसोबतच लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे या कामांची आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेत.

शनिवारी सिव्हील लाईन्स स्थित नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) ची आढावा बैठक झाली. त्यावेळी बावनकुळेंनी वरीलप्रमाणे निर्देश दिलेत. जिल्ह्यामध्ये जेजेएमअंतर्गत १३०४ गावांमध्ये शेकडो कोटीच्या निधीतून नळ योजनेशी संबंधित कामे हातात घेण्यात आली आहेत.

## नागनदी प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात तरतूद



**लोकशाही वार्ता/नागपूर**
उपराजधानीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नागनदी शुद्धीकरणासाठी केंद्र सरकारनेही अर्थबळ दिले आहे. अर्थसंकल्पात या प्रकल्पासाठी २९५.६४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

२०१६ मध्ये या प्रस्तावास तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने मंजुरी प्रदान केली होती. त्यावेळी हा प्रकल्प १२५२ कोटींचा होता. नंतर कर्जप्रक्रिया व इतर बाबींना झालेला उशीर आणि प्रकल्पातील बदलामुळे प्रकल्पाचा खर्चात वाढ झाली. या प्रकल्पात ६०:२५:१५ या प्रमाणात केंद्र, राज्य व मनपाचा वाटा राहणार आहे. जपानच्या जयका या संस्थेकडून कर्जही मंजूर झाले आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी नागपूर महापालिका करणार आहे. नदीत येणारे सांडपाणी अडविणे, वळविणे, प्रक्रिया करणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) बांधणे, सुलभ शौचालये तसेच नदीच्या काठावर सौंदर्यीकरण अशी कामे या प्रकल्पात राहणार आहे.

## तडीपार गुंडाला अटक

**लोकशाही वार्ता/नागपूर**
शहरात कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण करणाऱ्या गुंडांना शहरातून तडीपार करण्यात येते. परंतु, यातील बरेचशे गुंड विनापरवाना शहरात वावरत आहे. यातीलच एका गुंडाला पोलिसांनी पिस्तूल आणि एका जिवंत काडतुसासह अटक केली आहे. मनीष ऊर्फ लक्की गुरू पिल्ले (२५, रा. पंचशीलनगर) असे या गुंडाचे नाव आहे. माहितीनुसार, गिट्टीखदान पोलिसंचे पथक ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत होते. शनिवारी रात्री ११ वाजता त्यांना काटोल रोड येथे खोरी हनुमान मंदिराजवळील, सीपीडब्ल्यूडी बंद क्वॉर्टर परिसरात उपरोक्त आरोपी मनीष पिल्ले हा लपून वास्तव्य करत असल्याची माहिती मिळाली. माहितीवरून पोलिसांनी या ठिकाणी पाहणी केली. यावेळी पोलिसांना बघून मनीष पिल्ले हा पळू लागला. पोलिसांनीही त्याचा पाठलाग करीत ताब्यात घेतले. अंगझडतीत त्याच्याजवळ एक लोखंडी देशी बनावटीची पिस्तूल आणि एक जिवंत काडतूस सापडले. ते पोलिसांनी जप्त केले. आरोपीला पोलिस ठाण्यात आणून अभिलेख तपासला असता त्याला परिमंडळ क्रमांक २ च्या पोलिस उपायुक्तांनी १९ सप्टेंबरला एका वर्षासाठी त्याला नागपूर शहर व ग्रामीण भागातून हद्दपार केले असल्याचे आल्याचे समजले. आरोपी हा विनापरवाना शहरात अग्निशस्त्रासह वावरत होता. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ३/२५ भा.ह.का, सहकलम १३५, १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली आहे.

# होलसेल व्यावसायिकाची ६३ लाखांनी फसवणूक

## मालाची विक्री करून लांबविली रक्कम : गुन्हा दाखल

**लोकशाही वार्ता/नागपूर**
मध्यप्रदेशात हातमोजे (हँडग्लब्ज) ची मोठी मागणी असून कमिशनवर मालाची विक्री करून देतो, असे सांगणाऱ्या आरोपीने शहरातील एका होलसेल व्यावसायिकाला ६३ लाख रुपयांचा गंडा घातला. मयूर हरदेश मुलचंदानी (३८, रा. प्लॉट नंबर ९०, सेठीया चौक, जरीपटका) असे या आरोपीचे नाव आहे. तहसील पोलिस ठाणे हद्दीत फसवणुकीची ही घटना घडली.

माहितीनुसार, शांतीनगर कॉलोनी, एलआयजी क्वॉर्टर येथे फिर्यादी जयप्रकाश परमानंद धिंगडा (६०) राहतात. त्यांचे इतवारी रेडिमेड ओली, शहीद चौकाजवळ गंगा सन्स नावाने हॅन्ड गल्बस, रेडिमेड गारमेंटचे होलसेलचे दुकान आहे. कोरोना काळात त्यांचा मुलगा रोहित धिंगडा याची आरोपी मयूर मुलचंदानीसोबत ओळख झाली होती. मयूर याने रोहित धिंगडा याला मध्यप्रदेशात हातमोज्यांची मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे सांगितले. येथे माल विक्री करायचा असेल तर कमिशन बेसीसवर तो मी विक्री करून देऊ शकतो, असे विश्वासात घेतले. यानंतर रोहित धिंगडा यानेही मयूरला विक्रीकरिता तब्बल ७५ लाख रुपयांचा माल दिला. मयूर तो घेऊन मध्यप्रदेशात गेला आणि त्याने तो विक्री केला. यातून मिळालेल्या रकमेपैकी केवळ १२ लाख रुपये रोहित धिंगडा याला पाठविले. उर्वरित रक्कम मात्र पाठविली नाही. १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ दरम्यान हा प्रकार घडला. उर्वरित पैशांबाबत रोहित धिंगडा याने चौकशी केली असता आरोपीने ६३ लाखांची रक्कम ही स्वतःच्या तसेच आर.एम. एंटरप्रायजेसच्या खात्यावर टाकल्याचे समजले. यानंतर रोहितचे वडील जयप्रकाश धिंगडा यांनी मयूरला पैशांची मागणी केली. परंतु, पैसे न देता मयूरने त्यांना शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी धिंगडा यांनी तहसील पोलिसात तक्रार केली असता ठाण्याचे सह पोलिस निरीक्षक भगत यांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पाणी आरक्षण बैठक संपन्न

**लोकशाही वार्ता / नागपूर**
नागपूर जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणातील पिण्याचे पाणी आरक्षण करण्यासाठी जिल्हास्तरीय पाणी आरक्षण सभेची बैठक महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे पार पडली. पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणातील १५ नोव्हेंबर रोजी उपलब्ध असलेला पाणीसाठ्याच्या अनुषंगाने १५ जुलैपर्यंत पुरेल एवढा पिण्याकरिता पाणीसाठा राखून ठेवण्याबाबत सदरची बैठक आयोजित करण्यात आली.

यावेळी लाभक्षेत्र विकास प्राधिकरण नागपूरच्या कार्यकारी अभियंता प्रांजली टोंगसे यांनी जिल्ह्यातील सर्व प्रकल्पाच्या पाणी साठ्याबाबत माहिती सादरीकरणाद्वारे दिली. यावर्षी प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने शासनाने मंजूर केलेले आरक्षणावर चर्चा करण्यात आली. सर्व संबंधित यंत्रणेने उपलब्ध पाण्याचा सचोटीने पाणी वापराचे नियोजन करण्याबाबत त्यांनी निर्देश दिले. पिण्याच्या पाण्यासह कृषी क्षेत्रालाही आवश्यकतेनुसार पाणी सोडण्याचा या बैठकीत निर्णय घेण्यात आला.


## स्वच्छतागृहांमध्ये महिलांची चित्रफीत काढणाऱ्या विकृताला 'पीसीआर'

**लोकशाही वार्ता/नागपूर**
स्वच्छतागृहात लपून महिलांची चित्रफीत काढणाऱ्या विकृताला सीताबर्डी पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याची पोलिस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. आरोपी हा दिघोरीतील वैभवनगर येथील एका शाळेत चित्रकला शिक्षक आहे. मंगेश विनायकराव खापरे (३८, रा. कासरपुरा, इतवारी, नागपूर) असे आरोपीचे नाव आहे.

माहितीनुसार, शुक्रवारी विदर्भ साहित्य संघ संकुलात आयोजित एका कार्यक्रमात आलेली एक महिला स्वच्छतागृहात गेली होती. यावेळी, आरोपी हा लपून स्वच्छतागृहाच्या खिडकीतून मोबाईलने तिची चित्रफीत काढत होता. अचानक महिलेला काही विचित्र हालचाल जाणवल्यामुळे तिचे लक्ष खिडकीत गेले. यावेळी महिलेने आरडाओरड केली असता काही नागरिकांनी आरोपीला पकडले आणि पोलिसांच्या हवाली केले. न्यायालयाने आरोपीला एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. तपासात पोलिसांनी आरोपीचा मोबाईल तपासला असता त्यात अशाप्रकारचे महिलांचे स्वच्छतागृहातील ८ ते १० चित्रफिती आढळल्या. महत्त्वाचे म्हणजे, यापूर्वी २०२४ मध्येदेखील अटक झाली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात तीन दिवस आयोजित करण्यात आलेल्या खासदार औद्योगिक महोत्सवादरम्यान स्वच्छतागृहात त्याने महिलांचे व्हिडीओ बनविले होते.

## आदिवासी आरोग्य धोरण निश्चितीसाठी 'ब्लॉसम' महत्त्वपूर्ण

### कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर यांचे प्रतिपादन



**लोकशाही वार्ता / नागपूर**
आदिवासी आरोग्य धोरण निश्चितीसाठी 'ब्लॉसम' प्रोजेक्ट महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (एमयुएचएस)च्या कुलगुरू लेफ्ट. जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांनी केले.

एमयुएचएस व एम्स यांच्या विद्यमाने 'एमयुएचएस फिस्ट २०२५' या परिषदेचे एम्समध्ये आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत 'ट्रायबल डेव्हलमेट थ्रु एज्युकेशन, रिसर्च ॲण्ड डेव्हलमेंट' विषयावर डॉ. कानिटकर बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे, माजी खा. पद्मश्री डॉ. विकास महात्मे, राज्याचे निवडणूक आयुक्त व शासनाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे अतिरिक्त सचिव डॉ. दिनेश वाघमारे उपस्थित होते. डॉ. कानिटकर यांनी सांगितले की, आदिवासी भागातील विविध आजारांचे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात प्राप्त माहिती अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या परिषदेचा समारोप रविवार, २ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**डॉ. प्रकाश आमटे यांनी सांगितले की, आदिवासी भागात आजही आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात आहेत. शिक्षण आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून आरोग्यविषयक समस्या सोडविणे शक्य आहे. स्व. बाबा आमटे यांच्या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन करीत त्यांनी आरोग्यसेवेच्या माध्यमातून आदिवासींचे जीवन सुकर करण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. या परिषदेच्या माध्यमातून आरोग्यविषयक समस्यांवर उपचार व उपाय शोधनू काढणे महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.**

# मनपाच्या ताफ्यात 'मॅकेनाइज्ड रोड स्विपिंग मशिन'

## रस्ते आणि उड्डाणपुलांच्या सफाईसाठी उपयोगी : पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**लोकशाही वार्ता/नागपूर**
शहरातील रस्ते आणि उड्डाणपुलांची यांत्रिकी पद्धतीने सफाई करण्यासाठी मनपाद्वारे चार 'मॅकेनाइज्ड रोड स्विपिंग मशिन' खरेदी करण्यात आलेल्या आहेत. या चारही मशिनचे शनिवारी (ता.१) सिव्हील लाईन्स येथील जिल्हा नियोजन भवन परिसरात महसूलमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

याप्रसंगी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार प्रवीण दटके, परिणय फुके, कृष्णा खोपडे, विकास ठाकरे, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजयकुमार मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, मनपा अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल, उपायुक्त विजय देशमुख, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, कार्यकारी अभियंता राजेश गुरमुळे, उपअभियंता उज्ज्वल लांजेवार आदी उपस्थित होते.



शहरात चार पदरी रस्त्यांचे व उड्डाणपुलांचे जाळेदेखील वाढत आहेत. यातून वायुप्रदूषणामध्ये वाढ होण्याची शक्यता वाढत आहे. रस्ते स्वच्छ करण्याकरिता लागणारे मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने यांत्रिकी पद्धतीचा वापर करून रस्ते व उड्डाणपुलांची साफसफाई करणे आवश्यक आहे. यासाठी पालिकेद्वारे १५व्या वित्त आयोगातील अनुदानातून मॅकेनाइज्ड रोड स्विपिंग मशिन खरेदी करण्यात आल्या. २०२२ मध्ये राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत प्राप्त निधीतून मनपाद्वारे दोन मॅकेनाइज्ड रोड स्विपिंग मशिन खरेदी करण्यात आलेल्या होत्या. मे. ॲन्थोनी वेस्ट हँडलिंग सेल, ठाणे यांच्याकडून एक मशिन भाडेतत्त्वावर घेऊन वापरण्यात येत आहे. अशाप्रकारे जुन्या तीन आणि नवीन चार अशा ७ मशिन उपलब्ध आहेत. मशिनमध्ये देण्यात आलेल्या हाय सक्शन हास पाईपच्या मदतीने रस्ते सफाई करताना रस्त्यालगत जमा करण्यात आलेले कचऱ्याचे ढिगारे तसेच नागरिकांमार्फत टाकण्यात येणारे कचऱ्याची ढिगारे मनुष्यबळाचा वापर व हाताळणी न करता मशिनद्वारे सहजरित्या उचलणे शक्य होणार आहे.

### मशिनची वैशिष्टे

- **चेसिसचा प्रकार:** १६ टन.
- **चेसिस इंजिन पॉवर बीएचपी:** १६० एचपी.
- **ऑक्झिलरी डिझेल इंजिन पॉवर:** १५५ एचपी.
- **ऑक्झिलरी डिझेल इंजिनमध्ये सिलिंडरची संख्या:** ६.
- **ब्लोअर स्पीड :** किमान ३१३६ आरपीएम.
- **सक्शन होज किमान ६ मीटर:** ४.२ मीटर चाकांवर ट्रॉलीसह.

# अर्थसंकल्प मान्यवरांच्या नजरेतून

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शनिवारी लोकसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करण्यासह अनेक घोषणा करण्यात आल्या आहेत. शेतकरी, सर्वसामान्य, महिलांसाठीही योजनांची तरतूद करण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प देशाला विकासाच्या वाटेवर घेऊन जाणारा असल्याचे सांगत सत्ताधाऱ्यांनी बजेटचे स्वागत केले. तर, अर्थसंकल्पात घोषणांचाच पाऊस असल्याचे सांगत विरोधकांनी मात्र, सरकारने तोंडाला पाने पुसल्याचा आरोप केला आहे.**

## मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिला आहे. आर्थिक विकास, राजकोषीय शिस्त तसेच औद्योगिक विकासाला प्राधान्य देणारे हे बजेट आहे. १२ लाखांचे उत्पन्न कर मुक्त केल्यामुळे, पैशांची क्रयशक्ती वाढून व्यवसाय तसेच उद्योगांना बळकटी येण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया चेंबर ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेड (सीएएमआयटी) चे अध्यक्ष डॉ. दीपेन अग्रवाल यांनी दिली.

## पर्यावरणासाठी भरीव तरतूद



पर्यावरण क्षेत्र पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला ३,४१२ कोटींची तरतूद केली. नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरण संवर्धनासाठी ३० कोटींचा निधी ५० कोटींवर आणला. जैवविविधता संवर्धनासाठीचे बजेट ३.५ कोटींवरून १० कोटी करण्यात आले आहे. जलीय परिसंस्थेच्या संवर्धन, प्रोजेक्ट टायगर आणि प्रोजेक्ट एलिफंट, नवीकरणीय ऊर्जा, अणुऊर्जा मिशन, अक्षय ऊर्जा आदीं क्षेत्राला भरीव निधी दिल्याची प्रतिक्रिया ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या टीम लीडर सुरभी जैस्वाल यांनी दिली.

## मध्यमवर्गीयांची बचत वाढविणारे बजेट



केंद्रीय अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. अर्थसंकल्पात १२ लाखांच्या उपन्न मर्यादेला करातून मुक्त करण्यात आले आहे. बजेटमध्ये टॅक्स स्लॅबला चालना, टीडीएस, टीसीएसमध्ये दिलासा आदी घोषणा मध्यमवर्गीयांसाठी अतीशय महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. मध्यमवर्गीच्यांच्या बचतीत यामुळे वाढ होणार असून त्यांची खर्च करण्याच्या क्षमतेतही वाढ होणार असल्याची प्रतिक्रिया बागडी वेल्थचे शेअर ब्रोकर, वित्तीय सल्लागार प्रतीक बागडी यांनी दिली आहे.

## आत्मनिर्भर भारताला मिळेल बळ



सर्वसमावेशक व सर्वांचे हित साधणारा व भारताच्या सर्वंकष विकासाला गती देणारा अर्थसंकल्प आहे. उद्योग, रोजगार व विकासाला अर्थसंकल्पातून गती मिळेल. अर्थसंकल्पात शिक्षण, आरोग्य आणि कृषी यासह मध्यमवर्ग व युवकांच्या कल्याणाचा विचार या त करण्यात आल्याने देशाच्या प्रगतीचा आलेख उंचावेल. मध्यमवर्गीयासह शेतकऱ्यांच्या हिताचा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया विधान परिषद सदस्य कृपाल तुमाने यांनी दिली.

## बजेटमधून ग्रामीण सहकाराला प्रधान्य



सहकार क्षेत्रासाठी नवे प्रस्ताव असून ११८६ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली. प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या संगणकीकरणावर ५६० कोटींची तरतूद आहे. कृषी गामीण विकास बँक व राज्य शासनाच्या सहकार खात्याची निबंधक कार्यालये संगणीकृत करण्यावरही भर दिला गेला. एकूणच सादर अर्थसंकल्प हा विकसित भारताचे आत्मनिर्भर मॉडेल आहे, अशी प्रतिक्रिया सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी दिली आहे.

## व्यापारी, गरीब, महिला व शेतकऱ्यांची निराशा

विविध घटकांना न्याय दिला नसून भूलभुलैया अर्थसंकल्प सादर केला आहे. मजूर, व्यापारी, शेतकरी व महिलांना कोणताही दिलासा दिलेला नाही.



महागाई कमी करतील याची उत्सुकता महिलांमध्ये होती, मात्र निराशा झाली. बेरोजगार युवकांना रोजगार देण्याची योजनाच नाही. आदिवासी, ओबीसी, दलित व अन्य मागासवर्गीयांना न्याय देणारी योजना नसल्याने निराशा झाल्याची प्रतिक्रिया झालेली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीस अॅड. नंदा पराते यांनी दिली.

## शेतकऱ्यांना समर्पित आत्मनिर्भर बजेट



मध्यमवर्गीयांसह बजेटमधून शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. नागपूर नागनदी प्रकल्पासाठी २९५ कोटींचा निधी, दाळ, कापूस उत्पादन वाढविण्यासाठी क्रेडिट कार्डची सीमा वाढविणे, ५० पर्यटन क्षेत्रांचा विकास करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. अर्थसंकलात इलेक्ट्रिक वाहनांना, लघु उद्योगांना चालना, महिला तसेच मागास वर्गासाठी प्रथमच व्यवसायासाठी ५ लाखांची आर्थिक तरतुदींसह आत्मनिर्भर भाराताचे हे बजेट आहे, अशी प्रतिक्रिया आ. कृष्णा खोपडे यांनी दिली.

## भारत तिसऱ्या महाशक्तीचे बजेट



अर्थसंकल्प हा भारताच्या संभाव्या तिसऱ्या महाशक्तीचे प्रतिबिंब दर्शविणारा आहे. १२ लाखांच्या उत्पन्नावर कर सवलत सर्वसामांन्यासाठी सर्वात मोठी भेट आहे. विकासाच्या अंत्योदयी दृष्टिकोन बाळगत कृषी, पर्यटन, उद्योग, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण अशा सर्व आघाड्यांवर विकासाची देणारा अर्थसंकल्प आहे. सुधारित आयकर विधेयक हे सुटसुटीत आणि पारदर्शिता जपणारे राहील, असा विश्वास सहकारी बँकिंग तज्ज्ञ प्रा. संजय भेंडे यांनी व्यक्त केला आहे.

## विकासाभिमुख केंद्रीय अर्थसंकल्प



केंद्रीय अर्थसंकल्प विकासाभिमुख आहे. सरकारने कृषी, लघु व मध्यम उद्योग, गुंतवणूक व निर्यात हे प्रगतीचे चालक घटक मानत त्यात भरीव व दूरगामी परिणाम घडवणारी पावले टाकली. पंतप्रधान धनधान्य कृषी योजनेचा फायदा कमी कृषी उत्पादकता असलेल्या १०० जिल्ह्यांतील १.७० कोटी शेतकऱ्यांना होईल व कृषी उत्पादन वाढेल, असा विश्वास अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, संयुक्त अरब अमिरात (यूएई)चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ धनंजय दातार यांनी व्यक्त केला आहे.

## देशाला गतिमान करणारे अंदाजपत्रक

मध्यमवर्गीय, कृषी क्षेत्र आणि संरक्षणामध्ये व मध्यमवर्गीयांना दिलासा,



तर कृषी क्षेत्र आणि रक्षा क्षेत्रामध्ये गुंतवणूक रोजगार आणि सुरक्षा आदी सर्वच क्षेत्रांचा विचार अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. मध्यमवर्गीयांना विशेषतः नवीन नोकरीत असलेल्या सर्व युवकांना, व्यापारी व ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे. उद्योगासाठी नवीन योजना, जीवनावश्यक औषधांवर आदीसर्व बाबी या देशाला गतीमान करणारे ठरेल, अशी प्रतिक्रिया माजी आमदार गिरीश व्यास यांनी दिली.

## विकासाला द्रुतगती देणारा अर्थसंकल्प




आर्थिक लवचिकता, पायाभूत सुविधा विस्तार आणि रोजगार निर्मितीवर बजेटमधून लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विकसित भारत २०४७ दृष्टिकोनासह, शहरी व ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी उत्पादन, तंत्रज्ञान नवकल्पना, आधुनिक शेती, उद्योग आणि रोजगाराला प्राधान्य दिले आहे. याचा फायदा देशासह, महाराष्ट्र राज्य आणि विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातील जनतेला होईल, अशी प्रतिक्रिया आ. आशिष देशमुख यांनी दिली.

## विकसित भारताचे बजट



केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारताचे बजेट आहे. मध्यमवर्गीयांना दिलासा देतानाच बजेटमधून अर्थमंत्र्यांनी विविध क्षेत्रांतही भरभरून तरतूद केली. १२ टक्के वार्षिक उत्पन्नात सवलतीमुळे मध्यवर्गीयांना तसेच वेतनधारी नोकरदारांनाही यात मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांचाही बजेटमध्ये विचार करण्यात आला असून, त्यांनाही बजेटचा मोठा लाभ मिळेल, असा विश्वास सहकार मंचाचे अध्यक्ष तसेच व्यावसायिक मनोज अग्रवाल यांनी दिली.

## नागपूर विकासाला गती देणारा अर्थसंकल्प



देशातील गरीब, महिला, युवा, शेतकरी आणि मध्यमवर्गाला न्याय देत असतानाच निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पात नागपूर शहरातील नागनदी सुधार प्रकल्पासाठी २९५ कोटी रुपयांची विशेष तरतूद केंली आहे. देशातील पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, महिला, शेतकरी, युवा यांच्या उत्थानावर भर दिला आहे. प्रत्येक वर्गाच्या सर्वांगीण विकासासह देशाच्या बळकटीकरणाची दूरदृष्टी असलेला संकल्प ऐतिहासिक आणि पथदर्शी असल्याची प्रतिक्रिया माजी महापौर संदीप जोशी यांनी दिली.

## शेतकरी, कष्टकऱ्यांच्या श्रमाला न्याय देणारा अर्थसंकल्प



अर्थसंकल्प हा शेतकरी, कष्टकऱ्यांच्या श्रमाला न्याय देणारा आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गाच्या उत्थानासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद आहे. शेतकऱ्यांसाठी किसान क्रेडिट कार्ड्सच्या या कर्जाची मर्यादा वाढवून ५ लाख करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून देशातील सात कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाला सन्मान देऊन विकास होणार, असा विश्वास भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम म्हणाले.

## अर्थसंकल्पीय तरतुदीतून सामान्य, शेतकरी नदारद - खा.बर्वे



केंद्रीय वित्त मंत्र्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प निश्चितच निराशाजनक आहे. सदर अर्थसंकल्पात महाराष्ट्राकरिता विशेष अशी काहीच तरतूद नाही. परंतु मित्रराज्य बिहारसाठी मात्र, भरभरून तरतूद करण्यात आली आहे. सामान्य माणसाला उद्देशून ठेवलेला हा अर्थसंकल्प मुळातच नाहीच. कारण सामान्य नागरिकांना यात काहीच दिले गेले नाही. या देशाचा अन्नदाता शेतकऱ्यांना कुठलाच दिलासा दिल्या गेलेला नाही. एकूणच हा सामान्य माणसाशी कुठलाही संबंध नसलेला हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया खासदार श्यामकुमार बर्वे यांनी दिली.

## शेतकऱ्यांची घोर निराशा - अनिल देशमुख



शेतमालास बाजारात भाव मिळत नाही, नुकसान होऊनही कोणतीही मदत मिळत नाही, यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. याचा कोणताही विचार या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. शेतीसाठी लागणारे खते, बियाणे, कीटकनाशके, औजारे यावर मोठ्या प्रमाणात जीएसटी लावण्यात आला आहे. तो कमी करण्यासाठी काहीच विचार करण्यात आला नाही. कृषी क्षेत्रात महत्त्वाची असलेल्या मनरेगा योजनेला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात कुठलीही तरतूद केली नाही. एकूणच केंद्रीय अर्थसंकल्पातून कृषी क्षेत्राची आणि शेतकऱ्यांची घोर निराशा झाल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री अनिल देशमुख यांनी दिली.

## अपेक्षाभंग करणारा अर्थसंकल्प - सलील देशमुख



देशातील आर्थिक मंदी दूर करण्यासाठी कोणताही ठोस कार्यक्रम सरकारने मांडलेला नाही. शेतकरी, कामगार, युवा, महिला अशा सर्वच घटकांचा अपेक्षाभंग करणारा, हा निराशाजनक अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असे दरवर्षी सादर करण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पात सांगण्यात येते, ते याही अर्थसंकल्पात सांगण्यात आले. एकूणच या अर्थसंकल्पातून सर्वांचीची घोर निराशा झाल्याची प्रतिक्रिया माजी जि.प. सदस्य सलील देशमुख यांनी दिली.